आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ मार्च २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त भागातल्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाचा नियंत्रण कक्ष स्थापन

- इराणचे अमेरिकी दूतावासांवर हल्ले सुरूच/ इस्त्राएलचे इराणच्या अंतर्गत सुरक्षा केंद्रावर हल्ले

- राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी महाराष्ट्रातल्या जागांकरता भारतीय जनता पार्टीच्या ४ उमेदवारांची नावं जाहीर/ रामदास आठवले आणि विनोद तावडे यांचा समावेश

- देशाच्या उत्तर भागात आज होळीचा रंगोत्सव

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा उपान्त्य सामना आज कोलकात्यात दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडमधे रंगणार

<><><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे तिथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. १८०० ११८ ७९७ आणि ९१११ २३०१ २११३ या क्रमांकांवरून सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल. पश्चिम आशियात जवळपास १ कोटी भारतीय नागरिक राहतात आणि त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे. अमेरिका-इराण संघर्षादरम्यान इराणमधल्या भारतीय दूतावासाने तेहरानमधून शेकडो भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

<><><><><>

इराणच्या सैन्याने काल रात्री दुबईतल्या अमेरिकी दूतावासावर ड्रोन हल्ला केला. दूतावासातले कर्मचारी सुखरुप असल्याचं वृत्त आहे. अमेरिका इस्त्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी मारले गेल्यानंतर इराणने पश्चिम आशियातल्या अमेरिकन आस्थापनांवर हल्ल्यांचं सत्र सुरु केलं आहे. रियाध आणि कुवैत इथल्या अमेरिकी दूतावासांवरही गेल्या दोन दिवसात इराणने हल्ले केले.

दरम्यान, अमेरिका आता थांबणार नाही आणि इराणची लढण्याची क्षमता वेगाने घटत आहे असं अमेरिकेच्या मुख्य कमांडचे कमांडर एडमिरल ब्रँड कूपर यांनी म्हटलं आहे. अमेरिकेच्या ऑपरेशन एपिक फ्युरीच्या माध्यमातून १०० तासांहून कमी काळात अमेरिकेने जवळपास २ हजार ठिकाणांवर हल्ले केल्याची माहिती फ्युरी यांनी दिली.

<><><><>

इस्त्राएलने आज इराणच्या अंतर्गत सुरक्षा केंद्रांवर हल्ले चढवले. इराणच्या क्षेपणास्त्र डागण्याच्या यंत्रणेवर आणि इतर युद्ध सामुग्रीवरही हल्ला केल्याचं इस्त्राएलच्या सेना दलांनी सांगितलं. या हल्ल्यात इराणची हवाई संरक्षण यंत्रणा तसंच लढाऊविमानं उद्ध्वस्त झाल्याचं इस्त्राएलचं म्हणणं आहे. इस्त्राएलने बैरूटमधे हिजबुल्लाच्या तळांवरही पुन्हा हल्ले केले आहेत.

<><><><>

इराण अणुबॉम्ब विकसित करत होता असं सिद्ध करणारा कोणताही पुरावा मिळालेला नाही, असं आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संघटनेचे महासंचालक राफाएल मारियानो ग्रोसी यांनी म्हटलं आहे. मात्र अण्वस्त्र तयार करण्यासाठीच्या युरेनियमचा मोठा साठा लपवून ठेवून त्याच्या तपासणीला नकार देण्याची इराणची कृती चिंताजनक आहे असं त्यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमावर त्यांनी लिहीलंय की इराणचा अणुकार्यक्रम शांततापूर्ण उद्दिष्टांसाठीच असल्याची खात्री इराणने परीक्षणासाठी सहकार्य केल्याशिवाय देता येणार नाही.

<><><><>

आखातातला संघर्ष थांबवण्यासाठी वाटाघाटीचा मार्ग स्वीकारावा असं आवाहन भारतानं पुन्हा केलं आहे. हा संघर्ष लवकरात लवकर थांबवण्याच्या बाजूनं भारत आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. सुमारे एक कोटी भारतीय आखाती देशात काम करतात, त्यांची सुरक्षितता भारतासाठी महत्त्वाची आहे, ज्या गोष्टीचा भारतावर थेट परिणाम होतो, त्यापासून भारत अलिप्त राहू शकत नाही, असं या निवेदनात म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या अस्थिरतेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर  परिणाम होऊ शकतो, भारताचे लोक जगभरात कामासाठी विखुरले आहेत, त्यामुळे भारताचा जहाजांवरच्या हल्ल्यांनाही विरोध असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

<><><><>

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजारांपेक्षा जास्त अंकांनी घसरून ७८ हजार ८००च्या आसपास व्यवहार करतो आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४००पेक्षा जास्त अंकांनी घसरून २४ हजार ४००च्या आसपास व्यवहार करतो आहे.

<><><><><>

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी महाराष्ट्रातल्या जागांकरता भारतीय जनता पार्टीने ४ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, ज्येष्ठ नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे.

विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीने अद्याप उमेदवार जाहीर केलेले नाहीत, आज ही नावं जाहीर होतील असं काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात आज होळीचा रंगोत्सव साजरा करण्यात येत आहे. उत्तर प्रदेश, हरयाणा, पश्चिम बंगाल, गुजरात या राज्यांमध्ये रंगोत्सव सुरू आहे. लोक एकमेकांना रंग लावून होळीच्या शुभेच्छा देत आहेत. उत्तर प्रदेशात बरेली आणि फिरोजाबादसह अनेक जिल्ह्यांमध्ये मिरवणुका काढल्या जाणार आहेत. मथुरा आणि वृंदावन इथे रंगोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. भजन, नृत्यांच्या साथीने फुलं आणि रंगांची उधळण करण्यात येत आहे. विविध मिठाया वाटल्या जात आहेत. परदेशी पर्यटकही या उत्सवात सहभागी झाले आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे देखील गोरखपूर इथल्या रंगोत्सवात सहभागी होतील.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना होळी आणि रंगोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रंगांचा हा सण सर्वांच्या जीवनात प्रेम आणि आशेची उधळण करतो तसंच एकता आणि बंधुभाव मजबूत करतो, अशा शुभेच्छा राष्ट्रपतींनी समाज माध्यमावर दिल्या आहेत.

होळीचा सण वाईटावर चांगल्याचा विजय साजरा करण्याचा सण असून तो वसंत ऋतुच्या आगमनाचा निदर्शक आहे. हा सण भारताच्या चैतन्यशील वृत्तीचं प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. रंग आणि आनंदाचा सण सर्वांच्या

आयुष्यात सुख, समृद्धी आणि यश घेऊन येवो, अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात केली आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही आज देशवासीयांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांचं आज नवी दिल्लीत आगमन झालं. परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री के.वी. सिंग यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. रायसिना डायलॉग २०२६ चे प्रमुख पाहुणे म्हणून स्टब भारत दौऱ्यावर आले आहेत. दोन्ही देशांचे संबध आणि स्थानिक तसंच जागतिक बाबींवर ते मोंदीबरोबर चर्चाही करतील.

स्टब यांचा भारत दौरा हा भारत फिनलंड संबधांना अधिक उंचीवर नेईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमांवरच्या मजकुरात म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्या अध्यक्षतेखाली आज विजयवाडा विमानतळाचे नवीन टर्मिनल तसंच नवी दिल्लीतल्या भोगपुरम इथल्या विमानतळाशी संबधित सर्वांची आढावा बैठक झाली. हे दोन्ही प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्याबाबत या वेळी चर्चा झाली. विमानवाहतूक अधिकारी, नागरी विमान प्रवास संचालनालय तसंच राज्य सरकारांमधले संबधित अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

भारतातली सोळाव्या शतकातली संत थिरुमन्काईची मुर्ती ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या वस्तूसंग्रहालयाने भारताला परत केली. तामिळनाडूच्या सौंदरराजा पेरुमल मंदिरातली ही मूळ मूर्ती १९६७ मध्ये एका लिलावात ऑक्सफर्डच्या अॅशमोलेन वस्तूसंग्रहालयाने घेतली होती. काल एका अधिकृत कार्यक्रमात ही मूर्ती भारताकडे सुपूर्द करण्यात आली.

<><><><><>

नागपूर मधल्या एसबीएम कंपनीत स्फोट होऊन वीस कामगारांचा मृत्यू झाल्याचा मुद्दा आज महाराष्ट्र विधानसभेत कॉँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला. नागपूर जिल्ह्यात स्फोटकांचे अकरा कारखाने आहेत, गेल्या तीन वर्षांत ४३ कामगारांचा मृत्यू झाला आहे. ही अतिशय गंभीर बाब असून यावर अद्याप कुणावरही कारवाई

झाली नाही असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. अशा प्रकारच्या घटना थांबविण्यासाठी कोणतीही पावलं उचलली गेली नाहीत अशी टीका करत वडेट्टीवार यांनी या कंपनीचं ऑडिट करण्याची मागणी केली.

वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय गंभीर असून शुक्रवारच्या आत सभागृहात यावर चर्चा केली जाईल असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला पहिला उपान्त्य सामना आज कोलकात्यात ईडन गार्डन्स मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडदरम्यान रंगणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरु होईल.

**//<><><><><>//**